# संविधान (एकशे तिनावी सुधारणा) अधिनियम, २०१९

[१२ जानेवारी,२०१९.]

भारताचे संविधान यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

तो, भारतीय गणराज्याच्या एकोणसत्तराव्या वर्षी, संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो:-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, संविधान (एकशे तिनावी सुधारणा) अधिनियम, २०१९, असे म्हणावे.

(२) तो, केंद्र सरकार, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

अनुच्छेद १५ ची सुधारणा.

२. अनुच्छेद १५ मध्ये, खंड (५) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल:-

"(६) या अनुच्छेदातील किंवा अनुच्छेद १९ च्या खंड (१) च्या उपखंड (छ) मधील किंवा अनुच्छेद २९ च्या खंड (२) मधील कोणत्याही गोष्टीमुळे,राज्यास,-

(क) खंड (४) व (५) मध्ये नमूद केलेल्या वर्गांव्यतिरिक्त, नागरिकांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या कोणत्याही वर्गांच्या उन्नतीकरिता, कोणतीही विशेष तरतूद करण्यास;आणि

(ख) खंड (४) व (५) मध्ये नमूद केलेल्या वर्गांव्यतिरिक्त, नागरिकांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या कोणत्याही वर्गांच्या उन्नतीकरिता, जी आरक्षणाच्या बाबतीत, विद्यमान आरक्षणांशिवाय असेल आणि प्रत्येक प्रवर्गातील एकूण जागांच्या कमाल दहा टक्क्यांच्या अधीन असेल,अशी कोणतीही विशेष तरतूद करण्यास, जेथवर अशा विशेष तरतुदी,अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये निर्देशिलेल्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांव्यतिरिक्त, खाजगी शैक्षणिक संस्थांसह अन्य शैक्षणिक संस्थांमधील,- मग त्या राज्याकडून अनुदानप्राप्त असोत किंवा नसोत- त्यांच्या प्रवेशाशी संबंधित असतील तेथवर,-

प्रतिबंध होणार नाही.

स्पष्टीकरण.- या अनुच्छेदाच्या व अनुच्छेद १६ च्या प्रयोजनार्थ, "आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग" असा असेल की जो, कुटुंबाचे उत्पन्न व आर्थिक वंचिततेचे इतर निर्देशांक यांच्या आधारे, राज्याकडून वेळोवेळी अधिसूचित करता येईल." .

अनुच्छेद १६ ची सुधारणा.

३. संविधानाच्या अनुच्छेद १६ मध्ये,खंड (५) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

"(६) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, खंड (४) मध्ये नमूद केलेल्या वर्गांव्यतिरिक्त नागरिकांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या कोणत्याही वर्गांसाठी, विद्यमान आरक्षणाशिवाय आणि प्रत्येक प्रवर्गातील पदांच्या कमाल दहा टक्क्यांच्या अधीन राहून, नियुक्त्या किंवा पदे यांमध्ये आरक्षण ठेवण्याकरिता कोणतीही तरतूद करण्यास, राज्याला प्रतिबंध होणार नाही.".

डॉ. जी. नारायण राजू,

सचिव, भारत सरकार.